## नि.दि.मु.क्र. ९४/२०१८ मधील आय.ए.क्र. ०१/२०१९ (निशाणी १९ ) वरील आदेश

प्रतिवादी क्र. ६ ने प्रस्तुत अर्ज तिची कैफियत स्वीकारण्यासाठी परवानगी मिळण्यास दाखल केलेला आहे. तिचे असे म्हणणे आहे की प्रस्तुत दावा तिचे विरुध्द विनाकैफियत आदेश होण्यावर आहे. तिला तिची कैफियत द्यावयाची होती. मात्र ती नजरचुकीने देण्याचे राहून गेले आहे. यावर वादीने म्हणणे दाखल करुन अर्जातील कारण समर्पक व प्रामाणिकपणाचे नाही. त्यामुळे अर्ज नामंजूर करण्यात यावा असे कथन केलेले आहे.

२. अभिलेखाचे अवलोकन करता प्रतिवादी क्र. ६ विरुध्द अद्याप विनाकैफियत आदेश झालेला नसल्याचे दिसून येते. प्रतिवादी क्र. ६ ही पुरशीस दाखल करुन प्रतिवादी क्र. १ च्या कैफियतीप्रमाणे तिची कैफियत असल्याचे नमूद करणार आहे असे तिचे कथन आहे. अशा परिस्थितीत तिची कैफियत स्वीकारल्यास वादीचे कोणतेही नुकसान होणारे नाही. सबब, प्रस्तुत अर्ज मंजूर करण्यात येतो व प्रतिवादी क्र. ६ ची कैफियत स्वीकारण्यात येते.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
Digitally signed by Bhanupratap Basantsingh Chouhan
Date: 2021.01.12 15:34:34 +0530

दि. १२/०१/२०२१ भानुप्रताप ब. चौहान

मालवण दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर

"CERTIFIED TO BE TRUE AND CORRECT COPY OF THE ORIGINAL SIGNED ORDER/JUDGMENT."

Chandrakala Vasant Chavan
NAME OF STENOGRAPHER